# वर्तमान पत्रातील बातमीचा मसुदा

## नुकतेच बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांना अमरावती जिल्हा परिषदमध्ये काम करून पदवी शिक्षण पूर्ण करण्याची संधी

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (IGNOU) यांच्या BBA (Services Management) या दूरस्थ पदवी अभ्यासक्रमासाठी शिक्षण घेणाऱ्या, अमरावती जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील, निवडक गुणवंत आणि होतकरु विद्यार्थ्यांना सन २०२५-२६ या वर्षापासून 'कमवा आणि शिका ' योजनेअंतर्गत अमरावती जिल्हा परिषद मध्ये १ आणि १४ पंचायत समित्यांमध्ये प्रत्येकी १ अशा एकूण १५ विद्यार्थ्यांना तीन वर्षासाठी **'डिजिटल आणि एआय सुलभक' (Digital and AI Facilitator)** म्हणून प्रशासकीय काम करण्याची संधी मिळणार आहे. IGNOU च्या BBA (SM) या कार्यानुभवावर आधारित दूरस्थ पदवी अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना ३ वर्षे एखाद्या कार्यालयामध्ये पूर्णवेळ इंटर्नशिप करणे बंधनकारक असते. ही तीन वर्षाची इंटर्नशिप गरजू पात्र विद्यार्थ्यांना देऊन, त्यांना केलेल्या कामाच्या बदल्यात विद्यावेतन देणारी **'कमवा आणि शिका '** ही नाविन्यपूर्ण योजना यंदाच्या वर्षापासून अमरावती जिल्हा परिषदेतर्फे राबविली जाणार आहे.

सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्याना त्यांनी केलेल्या कामापोटी पहिल्या वर्षी रु. ८,०००/- दुसऱ्या वर्षी रु. १०,०००/-आणि शेवटच्या वर्षासाठी रु. १२,०००/- इतके विद्यावेतन प्रत्येक महिन्यासाठी अदा केले जाईल.

सदर योजनेमध्ये सलग तीन वर्षे समाधानकारकरित्या केलेले काम आणि स्वयंअध्ययन यातून तिसऱ्या वर्षाच्या शेवटी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची (IGNOU) बीबीए म्हणजेच Bachelor in Business Administration (Services Management) ही कामातून पदवी आणि तीन वर्षे काम केल्याचे अमरावती जिल्हा परिषदेच्या वतीने कार्यानुभवाचे प्रमाणपत्र असा विद्यार्थ्याचा दुहेरी फायदा होणार आहे. तसेच १२ वी नंतरचे पदवीचे, स्पर्धात्मक युगामध्ये पुढे जाऊन कामाला येऊ शकणारे कार्याधारीत शिक्षण हे स्वत:च्या मेहनतीच्या कमाईवर करता येणार असल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास उंचावण्यास यामुळे मदत होणार आहे.

अमरावती जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील म्हणजेच अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील १८ ते २५ वयोगटातील नुकत्याच बारावी पास झालेल्या, **संगणक आणि विशेषत: कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) टूल्स चा प्रभावी वापर करता येणाऱ्या** गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीमती संजिता महापात्र (भाप्रसे), प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांचे मार्फत करण्यात येत आहे.

सदर योजनेसाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना स्वारस्य अर्ज करण्याची अंतिम मुदत ही १० जुलै २०२५ अशी असून त्यासाठी https://tinyurl.com/amravatizpibba2025 ही ऑनलाईन लिंक अमरावती जिल्हा परिषद यांच्या वतीने www.zpamravati.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**संजीता महापात्र (भाप्रसे)**
**प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती**

# अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत कमवा आणि शिका योजना

**योजनेचे प्रपत्र**

**योजनेचे नाव:** अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना ३ वर्षासाठी प्रशासकीय कामाचा अनुभव आणि रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारी 'कमवा आणि शिका योजना'

**योजनेचा मूळ उद्देश:**

हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे समाजातील बरेचसे होतकरू आणि गुणवंत विद्यार्थी हे उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. इयत्ता १२ वी पास झाल्यानंतर पुढे पदवीपर्यन्त शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. बारावी नंतर पारंपारिक पद्धतीने महाविद्यालयीन शिक्षण घेऊन पदवी मिळवू इच्छिणारे बरेचसे विद्यार्थी हे हलाखीच्या कौटुंबिक परिस्थितीमुळे पुढील शिक्षण अर्धवट सोडतात किंवा घेण्यास ते पूर्ण करण्यास असक्षम असतात, अशा विद्यार्थ्यांना पुढील पदवी शिक्षणाची संधी मिळावी आणि शिक्षण घेत असताना त्यांचे अर्थार्जन सुद्धा व्हावे ही आज महत्वाची सामाजिक गरज आहे. पारंपारिक पद्धतीने महाविद्यालयीन शिक्षण घेताना, कर्मशील ज्ञानाच्या अभावामुळे पदवी पूर्ण होऊन सुद्धा काही होतकरू आणि गुणवंत विद्यार्थी हे इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत आज मागे पडताना आपल्याला आढळून येत आहे. असे विद्यार्थी हे पदवी पूर्ण होऊनसुद्धा सुशिक्षित बेरोजगार म्हणून मागे रहात आहेत.

जिल्हा परिषद अमरावती मार्फत तसेच त्या अंतर्गत येणाऱ्या विविध पंचायत समित्यांमध्ये सध्या विविध योजनांचे तसेच राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध मिशनमोड वरील समाजोपयोगी प्रकल्पांचे काम युद्धपातळीवर चालू आहे. अपुऱ्या मनुष्यबळाअभावी बऱ्याच वेळेला विहित मुदतीमध्ये कामाचे ठरवून दिलेले उद्दिष्ट साध्य करणे आव्हानात्मक झालेले आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाचा तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी आणि कालसुसंगत असा उपयुक्त वापर करून कार्यालयीन कामकाजामध्ये गतिमानता आणणे आणि प्रलंबित कार्यालयीन कामकाजाचा विहित मुदतीमध्ये निपटारा करणे ही आता सर्व शासकीय कार्यालयांची मोठी गरज बनलेली आहे.

जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत ग्रामीण भागातील बारावी पास असलेल्या आणि पुढील पदवी शिक्षण पूर्ण करू इच्छिणाऱ्या होतकरू आणि गुणवंत) विद्यार्थ्यांना, नोकरीसाठी आवश्यक ते सर्व ज्ञान – कौशल्ये ही त्यांच्या दैनंदिन कामातून मिळावीत, असे प्रत्यक्ष कृतीशील शिक्षण घेताना त्यांना ३ वर्षासाठी निश्चित विद्यावेतन सुद्धा मिळावे यासाठी नावीन्यपूर्ण योजना राबवावी अशी बाब अमरावती जिल्हा परिषदेच्या विचाराधीन होती. सबब अमरावती जिल्हा परिषदेच्या वतीने, अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी अमरावती जिल्हा परिषदेसाठी १ व प्रत्येक प्रचायत समिती करीता १ याप्रमाणे एकुण १५ विद्यार्थ्याना तीन वर्षासाठी 'कमवा आणि शिका ' योजना राबविली जाणार आहे. या योजने अंतर्गत संबंधित निवड झालेल्या विद्यार्थ्यांना **'डिजिटल आणि एआय सुलभक' (Digital and AI Facilitator)** म्हणून तब्बल तीन वर्षे काम करण्याची संधी मिळणार नाहे. थोडक्यात कामाचे कार्यालयीन ठिकाण हेच जणू या विद्यार्थ्यांचे तीन वर्षासाठी त्यांच्या महाविद्यालयासारखे असणार आहे.

**योजनेच्या लाभाचा तपशील:**

प्रथम तीन वर्षांसाठी प्रायोगिक तत्वावर अमरावती जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील निवडक गुणवंत आणि होतकरु विद्यार्थ्यांना 'कमवा आणि शिका ' योजनेअंतर्गत अमरावती जिल्हा परिषदेच्या विविध विभागामध्ये, तीन वर्षासाठी प्रशासकीय काम करण्याची आणि पदवीनंतरच्या नोकरीसाठी आवश्यक विविध ज्ञान- कौशल्ये आत्मसात करून घेण्याची संधी इंटर्नशिप च्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जाईल. विद्यार्थ्याने केलेल्या कामापोटी पहिल्या वर्षी रु. ८,०००/- दुसऱ्या वर्षी रु. १०,०००/- आणि शेवटच्या वर्षासाठी रु. १२,०००/- इतके विद्यावेतन प्रत्येक महिन्यासाठी अदा केले जाईल. सदर योजनेमध्ये सलग तीन वर्षे समाधानकारकरित्या केलेले काम आणि स्वयंअध्ययन यातून तिसऱ्या वर्षाच्या शेवटी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची **(IGNOU)** बीबीए (एसएम) म्हणजेच **Bachelor in Business Administration (Services Management)** ही कामातून पदवी आणि तीन वर्षे काम केल्याचे अमरावती जिल्हा परिषदेकडून प्रमाणपत्र असा विद्यार्थ्याचा दुहेरी फायदा होणार आहे.

**योजना अटी आणि शर्ती:**

१) लाभार्थी हा अमरावती जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या ग्रामीण भागातील कायमस्वरूपी रहिवासी असावा.

२) लाभार्थी विद्यार्थी नुकताच बारावी पास झालेला असावा. (पदवी शिक्षण पूर्ण नसणाऱ्या किंवा काही कारणास्तव पदवी शिक्षण अर्धवट राहिलेल्या आणि ते पूर्ण न करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल.)

३) लाभार्थी हा संगणक साक्षर असावा. **उत्तमरीत्या संगणक हाताळणाऱ्या** आणि **संगणकाचा किंवा AI टूल्स चा कोणत्याही कार्यालयीन कामामध्ये चपखलपणे वापर करण्याची हातोटी** असलेल्या विद्यार्थ्यांचा निवड करतेवेळी प्राधान्याने विचार केला जाईल.

४) दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी लाभार्थ्याचे वय हे १८ पूर्ण ते २५ वर्षे दरम्यान असावे.

५) बीबीए पदवी अभ्यासक्रमासंदर्भात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (IGNOU) यांनी वेळोवेळी घालून दिलेल्या नियम आणि अटींचे लाभार्थ्याला पालन करावे लागेल.

६) इंटर्न म्हणून काम करण्यासाठी अमरावती जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागामार्फत निवड पत्र मिळाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याने अभ्यासक्रमाची प्रथम वर्ष रु. २०,०००/-, द्वितीय वर्ष रु. २०,०००/- आणि तृतीय वर्ष रु. २०,०००/- (सर्व करांसहित) या प्रमाणे ३ वर्षे फी ही स्वत: भरावयाची आहे. **इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची बीबीए (सर्व्हिसेस मॅनेजमेंट) या कार्यआधारित पदवी अभ्यासक्रमासाठी संबंधित विद्यार्थ्याची प्रवेश निश्चिती केल्यावरच इंटर्नशिप सुरू होणार आहे.** प्रवेश निश्चितीकरिता संबंधित विद्यार्थ्याला सुरवातीला प्रथम वर्ष फी २०,०००/- रुपये हे भरावे लागतात त्या अनुषंगाने विद्यार्थ्याची तयारी हवी. तसेच आपली द्वितीय आणि तृतीय वर्षाची फी सुलभरित्या वेळेत भरता यावी यासाठी दर महिना मिळणाऱ्या विद्यावेतनातून संबंधित विद्यार्थ्याने थोडी थोडी बचत करणे अपेक्षित आहे.

७) सलग तीन वर्षे इंटर्नशिप सुरू राहावी यासाठी विद्यार्थ्याने **इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची बीबीए (सर्व्हिसेस मॅनेजमेंट) या कार्यआधारित पदवी अभ्यासक्रमासाठी तीनही वर्षाला आपले प्रवेश विहित मुदतीमध्ये निश्चित करणे आवश्यक असते.** जर विद्यार्थी हा एखाद्या वर्षी काही कारणास्तव,

Internal

फी न भरता आल्याने संबंधित वर्षाकरिता आपला प्रवेश निश्चित करू शकला नाही तर संबंधित विद्यार्थ्याची अमरावती जिल्हा परिषदेतील इंटर्नशिप ही तत्काळ संपुष्टात येईल. सबब प्रत्येक वर्षी निश्चित केलेल्या प्रवेशाचा पुरावा विद्यार्थ्याला त्या त्या वर्षी अमरावती जिल्हा परिषदेला सादर करावा लागेल.

८) कामाच्या संदर्भात अमरावती जिल्हा परिषदेने वेळोवेळी घालून दिलेल्या नियम आणि अटींचे पालन करण्याची जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्याची असेल. सदर नियमांचे पालन न झाल्यास अथवा समाधानकारक काम नसल्यास अशा विद्यार्थ्याची कार्यालयीन सेवा कधीही थांबविण्याचा अधिकार हा अमरावती जिल्हा परिषदेला असेल.

९) सदर योजना ही तीन वर्षानी बीबीए पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास अमरावती जिल्हा परिषदेमध्ये कायमस्वरूपी अथवा कंत्राटी स्वरूपाच्या नोकरीची ऑफर / आश्वासन देत नाही.

१०) इंटर्नशिपसाठी रुजू होतेवेळी विद्यार्थी उमेदवाराने, अमरावती जिल्हा परिषदेने दिलेले निवडपत्र काळजीपूर्वक वाचावे. आणि त्यातील दिलेले नियम आणि अटी व शर्तींचे पदवी अभ्यासक्रम पूर्ण होई पर्यन्त काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. निवड केलेल्या लाभार्थ्याने इंटर्नशिप अर्धवट सोडून जाऊ नये म्हणून निवड झाल्यानंतर १ महिन्याच्या आत बंधपत्र करून देणे आवश्यक आहे.

११) सदर योजनेअंतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यास कोणत्याही नियमित पदावर हक्क सांगता येणार नाही. तसेच सदर निवडीच्या आदेशाने त्यांना कोणत्याही न्यायालयात वा प्राधिकरणाकडे अमरावती जिल्हा परिषदेच्या सेवेत नियमित करण्यास्तव दाद मागता येणार नाही.

१२) इंटर्नच्या निवड संख्येमध्ये किंवा त्यांना मिळणाऱ्या विद्यावेतनाच्या रकमेमध्ये वेळोवेळी बदल करण्याचे सर्वाधिकार हे अमरावती जिल्हा परिषदेने राखून ठेवलेले आहेत.

**आवश्यक कागदपत्रे:**

१) आधार कार्ड (पुढील आणि मागील बाजू)
२) पॅन कार्ड
३) शिधापत्रिका म्हणजेच रेशन कार्ड (मागील आणि पुढील बाजू)
४) दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र
५) बारावी उत्तीर्ण प्रमाणपत्र
६) MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण असल्यास त्याचे प्रमाणपत्र

Internal